श्रीमती सुशीलादेवी देशमुख वरिष्ठ महाविद्यालय, लातूर

शैक्षणिक वर्ष - 2022-23

प्रकल्प लेखन - Project work

* अनुक्रमणिका *

| अ. क्र. | विद्यार्थ्यांचे नाव | वर्ग | प्रकल्पाचा विषय |
|---|---|---|---|
| १ | उफाडे नागनाथ कुंडलिक | बी.ए. I | निबंधकार : लोकमान्य टिळक [१८५६ ते १९२०] |
| २ | शेख तारेर जलील | " | |
| ३ | भास्कर अमृता तुकाराम | " | |
| ४ | पुरडे योगेश धोंडीराम | " | |
| ५ | बनसोडे मायली अशोक | बी.ए. I | संत साहित्यातील आध्यात्मिक विचार : एक समीक्षा |
| ६ | राठोड विशाल सुरेश | " | |
| ७ | शिंडे प्रल्हाद पुंजाजी | " | |
| ८ | सुनापे विकास देविदास | " | |
| ९ | देशमुख कार्तिक रामकिशन | बी.ए. II | डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे शैक्षणिक विचार |
| १० | शेख शबनम मुस्तफा | " | |
| ११ | काझी तोफिक फिरोजअहमद | " | |
| १२ | वाघमारे विशाल वैजनाथ | " | |

→ मागे

| | | | |
|---|---|---|---|
| १३ | सुरवसे संदीप दिलीप | बीए III | |
| १४ | कांबळे सुबोध दयानंद | " | मराठी साहित्यातील निबंधकार |
| १५ | लोमटे वैष्णवी महादेव | " | |
| १६ | राठोड पुष्पा सुभाष | " | |
| १७ | शिकलकर निसार मुस्तफा | " | |

[मराठी विभाग]

मार्गदर्शक - डॉ. शंकरानंद येडले - [signature]
डॉ. सुरेखा बनकर - [signature]

[signature]
PRINCIPAL
Smt. Sushiladevi Deshmukh
Senior College, LATUR

Scanned with OKEN Scanner

श्रीमती सुशीलादेवी देशमुख वरिष्ठ महाविद्यालय, लातूर

शैक्षणिक वर्ष - 2022-23

"मराठी विभाग"

प्रकल्प लेखन → Project work

* प्रकल्पाचे शीर्षक *

1] → निबंधकार : लोकमान्य टिळक
(१८५६ ते १९२०)

** मार्गदर्शक **

डॉ. शंकरानंद चेडले
डॉ. सुरेखा बनकर

प्रकल्पलेखन कार विद्यार्थी

1) उफाडे नागनाथ कुंडलिक - बी.ए. प्रथम वर्ष
2) शेख ताहेर जलील - -"-
3) भास्कर अमृता तुकाराम - -"-
4) पुरंडे योगेश थोंडीराम - -"-

Scanned with OKEN Scanner

प्रकल्पविषय → १]

निबंधकार : लोकमान्य टिळक
[१८५६ ते १९२०]

* उद्देश → * केसरी व मराठा या दैनिकाचे संपादक म्हणून त्यांच्या कार्य व विचारांचे महत्व लक्षात घेणे.
* लोकमान्य टिळकांनी स्वातंत्र्य चळवळीचे नेतृत्व केले. ते कसे त्यांच्या विचाराच्या आधारे स्पष्ट करणे
* लोकमान्य टिळक हे निर्भय पत्रकार व लेखक होते
* लोकमान्य टिळकांचे विचार प्रभावी, ध्येयवादी, प्रेरणादायी आहेत.
* इंग्रजी राजवटीच्या विरोधात लोकमान्य टिळकांनी मांडलेले विचार स्वातंत्र्य चळवळीसाठी दीपस्तंभासारखे मार्गदर्शक होते.

* परिणाम / फलनिष्पत्ती (outcomes) :-
* स्वातंत्र्य चळवळीचे महत्व संपूर्ण भारत देशाच्या सर्व नागरिकांच्या मनामनात टिळकांनी रुजवले.
* वृत्तपत्र व दैनिकातून मांडलेल्या प्रभावी विचारामुळे सामाजिक प्रबोधन व स्वातंत्र्य चळवळ निर्माण झाली.
* प्रत्येक नागरिकाने निर्भय असावे याची जाणीव झाली
* लोकमान्य टिळकांच्या विचाराचा प्रभाव अनेक नेत्यावर होता.
* पत्रकारिता कशी असावी? याची जाणीव त्यांच्या निबंध-लेखनातून होते.
* स्वराज्य, देशप्रेम, राष्ट्रनिष्ठा, भाषा, संस्कृतीचे महत्व लो. टिळकांच्या विचारामुळे कळते.

LATUR

Scanned with OKEN Scanner

# निबंधकार : लोकमान्य टिळक
## १८५६ ते १९२०


१) उफाडे नागनाथ कुंडलिक
२) शेख नादेर जलील
३) भास्कर अमृता तुकाराम
४) धरडे योगेश थोंडीराम

मार्गदर्शक

डॉ. शंकरानंद किसनराव येडले
सहयोगी प्राध्यापक व मराठी विभाग प्रमुख
लातूर


केसरी व मराठा या वर्तमानपत्राचे पादक, बाळ गंगाधर लोकमान्य टिळक हे गोपाळ गणेश आगरकर यांचे पुणे येथे महाविद्यालयीन शिक्षण घेताना मित्र होते. विष्णूशास्त्री चिपळूणकर यांचा सहवास यांना लाभला होता. महाविद्यालयात या देशातील सामाजिक व राजकीय प्रश्नावर दोघेही गंभीर चर्चा करत होते. राजकीय स्वातंत्र्याचा विचार लोकमान्य टिळक करत होते. गो.ग. आगरकर हे अगोदर सामाजिक सुधारणा महत्वाची असे म्हणत होते. एकत्र असूनही दोघांचे विचार भिन्न होते. विष्णूशास्त्री चिपळूणकरांचा जितका प्रभाव टिळकावर होता तितका तो आगरकरावर नव्हता. आगरकर हे नवविचाराचे, आधुनिकतेचे, नवजाणीव व नवज्ञानाचे समर्थक होते. त्यांना धर्मनिष्ठेपेक्षा बुध्दिवाद अधिक महत्त्वाचा वाटत होता. "वाचाल तर वाचालफ असे मत मांडणारे आगरकर माझे विचार वाचणारा एकही वाचक असला तरी त्याच्यासाठी मी लिहिणार! हा आगरकरांचा बाणा होता. केसरी, मराठा, या दैनिकात लोकमान्य टिळक यांच्याबोबत काम करताना आपल्या वैचारिक मतभिन्नतेमुळे आगरकर त्यांच्यापासून स्वतंत्र झाले व त्यांनी सुधारक हे नियतकालिक काढले. स्वतंत्रपणे तितक्याच निर्भयतेने ते लिहित होते.

खरे तर लेखक हा निर्भयच असावा लागतो. लोकहितवादी, चिपळूणकर, जितके निर्भिडपणे लिहित होते तितकेच लोकमान्य टिळकही निर्भय होते. गो.ग. आगरकर सुध्दा निर्भयतेचे समर्थक होते. सर्वच लेखक न भिता, डगमगता आपल्या विचाराप्रमाणे लिहित होते. निबंधकार निर्भय असला पाहिजे ही जाणीव सर्वच निबंधकारांच्या विचारातून स्पष्ट होते. तसे सर्वांचे लेखन परखड व तितकेच स्पष्ट आणि निसंःदिग्ध होते.

केसरी व मराठा या दैनिकातून लोकमान्य टिळक लिहित होते. त्यांनी लोकसंघटन करण्याच्या भूमिकेतून आपले प्रभावी असे विचार मांडण्याबरोबरच लोकजागृतीची एक ध्येयवादी भूमिका घेवून समर्पित भावनेने भरीव असे लेखन लोकमान्य टिळकांनी केले. आपणास हे ज्ञात आहेच की, "स्वातंत्र्य हा माझा जन्मसिध्द हक्क आहे आणि तो मी मिळविणचफ ही घोषणा त्यांनी दिली. ब्रिटीशांच्या राजवटीतील इंग्रजी अधिकाऱ्यांचा जुलुम, अत्याचार व अन्यायाविरूध्द त्यांनी आवाज उठवला.

इंग्रज सरकारचे डोके ठिकाणावर आहे काय? असा त्यांच्या लेखाचा मथळा होता. केसरी व मराठा या दैनिकातून लिहितांना ते इंग्रजी राजवटीच्या विरोधात ते स्पष्ट व परखडपणे लिहित होते. इंग्रज सरकारच्या कारभारावर त्यांनी अनेक कोरडे ओढले. लोकमनातील असंतोषाला वाचा फोडली.

लोकमान्य टिळकांचा प्राचीन साहित्याचा अभ्यास व व्यासंग खूप होता. भारतीय परंपरेचा त्यांना



Scanned with OKEN Scanner

अभिमान होता. देशाभिमान व स्वातंत्र्याच्या हक्काविषयी लोकांना जागे करणे, लोककल्याणाचा विचार करणे या एका ध्येयामुळे ते राजकारणात उतरले. समग्र भारताचे नेतृत्त्व त्यांनी केले. लोकजागृतीचे माध्यम म्हणून वृत्तपत्रातून त्यांनी प्रभावी असे लेखन केले. सरकारच्या विरोधात परखडपणे लिहिल्यामुळे त्यांना सरकारचा रोष पत्करावा लागला. लोकमान्य टिळकांची त्यांच्या लेखनांमुळे व भाषणामुळे इतकी लोकप्रियता वाढली होती की, ते या लोकप्रियतेच्या बळावर पुण्याच्या नगरपालिकेत निवडून आले. या बरोबरच मुंबईच्या कायदेमंडळावरही ते निवडून गेले. त्यांनी सरकरची जी दुष्कृत्ये आहेत त्या विरोधात वर्तमानपत्रातून आवाज उठवला. त्यांचे चळवळीचे व प्रभावी असे नेतृत्त्व पाहून इंग्रज सरकार त्यांना कसे पकडावे व अडचणीत आणावे म्हणून संधी शोधत होते. इंग्रजांनी त्यांच्यावर राजद्रोहाचा खटला भरला. त्यामुळे त्यांना एक वर्षाची शिक्षा झाली. यामुळे एक वर्षभर ते तुरुंगात होते. त्या नंतर ते जेव्हा बाहेर आले तेव्हा त्यांनी पुन्हा अत्यंत प्रभावी असे लोकजागृतीचे कार्य हे झपाटलेल्या ध्येयाने सुरु केले.

स्वदेश, स्वराज्य, बहिष्कार आणि राष्ट्रीय शिक्षणांचा त्यांनी पुरस्कार केला. या चर्तुसुत्रीची त्यांनी घोषणा केली. केसरी या वृत्तपत्रातून अत्यंत जळजळीत भाषेत ते परखडपणे लिहित होते. राजकीय स्वातंत्र्याचा विचार त्यांना अत्यंत महत्त्वाचा वाटत होता. इंग्रजाच्या परकीय विचारधारांना व त्यांच्या संस्कृतीला आणि तथाकथित सुधारणांना त्यांनी प्रखर असा विरोध केला. स्वदेश, स्वराज्याचा ते पुरस्कार करतात. या बरोबरच त्यांनी केसरीमधून वंगभंगाच्या चळवळीला पाठिंबा दिला. महाराष्ट्रात लोकप्रबोधनाचे आणि लोकजागृतीचे कार्य करताना त्यांनी सारा महाराष्ट्र जागा केला. त्यांच्या कार्याचे पडसाद देशभर उमटत होते. स्वातंत्र्य चळवळ उभी राहत होती. पुन्हा एकदा सरकारने त्यांच्यावर राजद्रोहाचा आरोप ठेवून त्यांना सहा वर्षांची शिक्षा दिली व मंडालेच्या तुरुंगात ठेवण्यात आले तेथेही ते शांत बसले नाहीत. याच ठिकाणी लोकमान्य टिळकांनी अभ्यासपूर्ण असा ङ्गगीतारहस्यङ्क हा ग्रंथ लिहिला. तुरुंगातून सुटल्यानंतरही राजकीय कार्य त्यांनी चालू ठेवले. १ ऑगस्ट १६२० रोजी मुंबई येथे त्यांचा देहान्त झाला.

अत्यंत उत्कट अशी देशभक्ती त्यांच्या ठायी होती. लोककल्याणाच्या भावनेतून व देशप्रेमातून त्यांनी झपाटलेल्या ध्येयाने आपले विचार मांडले. अत्यंत परखड, ओजस्वी व प्रभावी असे लेखन ते करत होते. ते अत्यंत निर्भिड होते. झुजार वृत्तीने ते लढले. प्राचीन साहित्याचा त्यांचा अभ्यास दांडगा होता.महाकाव्यातील अनेक संदर्भाचे दाखले देवून ते लिहित असत. अत्यंत तर्कशुध्द असे परखड विचार ते मांडत असत. त्यांच्या लेखनातून त्यांचा व्यासंग व अभ्यास किती सखोल होता याची जाणीव होते. सहज, सुलभ भाषेत लिहिताना आपले विचार कसे तेजस्वी होतील ते सर्वांना समजतील याची ते दक्षता घेत. आपल्या बुध्दिमत्तेचा डौल दाखवावा म्हणून ते लिहित नव्हते. त्यांची भाषा एखाद्या पंडिताप्रमाणे अलंकार प्रचूर नव्हती तर ती सहज ओघवती आणि तितकीच प्रभावी होती. वाङ्मय विलास साधावा म्हणून ते लिहित नव्हते तर आपले विचार सुबोध कसे होतील. दुर्बोध वाटणार नाहीत या बाबीकडे त्यांनी लक्ष दिले.

विद्यार्थी जीवनात एकाच महाविद्यालयात शिकत असलेले लोकमान्य टिळक आणि गोपाळ गणेश आगरकर हे महाविद्यालयीन मित्र होते. अगोदर सामाजिक सुधारणा की राजकीय स्वातंत्र्य या विषयावर दोघांचे विचार परस्पर भिन्न होते. आपआपल्या विचारावर दोघेही ठाम होते. अगोदर सामाजिक सुधारणा हा विचार गो.ग. आगरकरांचा होता. तर लोकमान्य टिळकांना अगोदर राजकीय



Scanned with OKEN Scanner

स्वातंत्र्य मिळाले तरच आपल्याला जशा हव्या तशा सामाजिक सुधारणा नंतर करून घेता येतील, असे लोकमान्य टिळकांचे मत होते. दोघांच्या मतांचा विचार करताना ते चुकीचे बोलत असे नाही तर ते त्यांचे वैयक्तिक विचार होते. विचार हे अधिक महत्त्वाचे असतात. स्वतःला वाटलेले विचार परखडपणे मांडणे महत्त्वाचे असते. तसे हे दोघेही लिहित होते. पुढे आपण गो.ग. आगरकरांच्या लेखनांचा विचार करणार आहोतच. तरीही लोकमान्य टिळक विचारांच्या संदर्भात एके ठिकाणी असे म्हणतात, ‟कागद आणि लेखनी विचारांना चिरकालच बहाल करतात.” अर्थात हे विचार स्वार्थी आणि तात्कालिक असू नयेत. विचार मौलिक असतील तरच त्याचा प्रभाव कायम टिकतो.

ना.सी. फडके यांचया समकालिन लेखन करणारे मराठी साहित्यातील थोर लेखक ज्ञानपीठ पुरस्काराचे गौरवशाली मानकरी वि.स. खांडेकर यांनी कथा कादंबरी या साहित्यप्रकारात अत्यंत भरीव दर्जेदार व गुणात्मक असे लेखन केले. तसेच त्यांनी मराठी साहित्यात खूप सुंदर असे निबंधही लिहिले. त्यांच्या निबंधात काव्यात्म भावानुभवातील तरल असे विचार जे वाचकांच्या संवेदनांना कलात्मकतेचा अनुभव देतात. वि.स. खांडेकर हे एक प्रज्ञावंत आणि प्रतिभावंत असे लेखक होते. त्यांच्या कल्पना किती उदात्त होत्या, विचार कसे प्रगल्भ असतात, आपले विचार प्रकट करताना भाषेचा वापर वि.स. खांडेकर कसे करतात ते त्यांचे निबंध वाचले तर आपल्या लक्षात येईल. लघुनिबंधाविषयी लिहिताना वि.स. खांडेकरांनी म्हटले आहे, ‟लघुनिबंध लेखकाच्या मनात प्रवेश करतो. तो त्याला गुदगुल्या करीत गमतीदार विचार, चमत्कृतिपूर्ण कल्पना, जीवनातील विसंगती सौम्यपणे सूचित करणारा प्रसंग, नाजूक, तांबूस पालवीप्रमाणे एखादी साधी व गोड भावना लेखकाच्या व्यक्तिमत्त्वाला स्पर्श करून जाते आणि लघुनिबंधाचे बीज रूजते.” रा.श्री. जोग गौरवग्रंथ पृष्ठ २४६

वि.स. खांडेकर यांच्या लघुनिबंधात काव्यात्मकतेचा अनुभव तर येतोच पण त्याबरोबर त्यांच्या विचारातील चिंतनही विचारप्रवर्तक असे असते. विचाराची जशी रेलचेल तसेच अधुन-मधुन येणारे विनोदही मोठे मार्मिक असतात. ते परिस्थितीवर भाष्य करतात. यातील त्यांच्या कल्पना अत्यंत मोहक असतात. आपण एखाद्या बागेत उमललेले फुल किंवा लहाण मूल पाहिल्यानंतर जसे प्रसन्न वाटते अगदी तसेच भावरम्य असे विचार वि.स. खांडेकर यांच्या निबंधाचे वाचन करताना प्रसन्नतेचा अनुभव येतो. त्यांचे निबंध सुमधूर अविट गोडी असलेले ज्याची रूची चाखताना म्हणजे एक वाचक म्हणून त्यांच्या निबंधाचा आस्वाद घेताना या निबंधातून आलेले सुविचार, सुभाषिते, चपखलपणे वापरलेले संवाद, चटकदार वळण घेत घेत केलेली भावपूर्ण तितकीच अर्थपूर्ण अशी वाक्यरचना, किती कौशल्याने आणि मार्मिक पध्दतीने काळजीपूर्वक वि.स. खांडेकर लिहितात याचा मराठी साहित्यात अनेक नामवंत निबंधकार झाले आहेत. प्रत्येकाचे आठवणी. या सर्वांचा उपयोग ते अत्यंत कौशल्याने करतात. त्यांची वर्णने लेखक म्हणून साने गुरुजींच्या निबंधाचा विचार करता येईल. एखादा निबंध लिहिताना केवळ कल्पनेपेक्षा प्रत्यक्ष अभ्यास व प्रमाण अनेक संदर्भ व उदा. देवून आपण आपला विचार प्रमाणिकपणे मांडला पाहिजे. आपले विचार मांडताना आपण जो अभ्यास केला आहे आणि आपल्या जवळ जे विचार आहेत ते नेमकेपणाने सांगता येणे, आपले विचार हे पूर्वग्रहदुषित नसलेले, अत्यंत निर्मळ, पवित्र, शुध्द कोणताही संदेह मनात निर्माण करणार नाहीत. कोणत्याही शंका, कुशंका असणार नाहीत, असा अत्यंत निर्मळ झऱ्यासारखा प्रवाही विचार, खळखळून मनात आलेला आणि मनातून प्रकट झालेला सानेगुरुजींच्या निबंधात पाहता येतो. निबंध पाहण्यासारखे आहेत. त्यांच्या ग्रंथाचा अभ्यास आपणही एक खुमासदार अशी असतात. लेखन करताना ते पाल्हाळीकता येऊ



Scanned with OKEN Scanner

देत नाहीत. जसे प्रवास करताना आपोआपच बाह्य जगाचे प्रवासगाडीतील खिडकीतून जगाचे दर्शन घडते. शहर, डोंगरदऱ्या, निसर्ग, खेडी, जंगल, हे आपण खिडकीत बसून पाहतो अगदी तसेच प्रा. अनंत काणेकर हे लघुनिबंध लिहिताना मानवी जीवनाच्या प्रवासातील चढ-उतार दाखवून देतात. जीवनात सुख-दुःखे आहेतच ती येतात जातात जीवनाचा प्रवास कसा होतो हे त्यांच्या निबंधातून अनुभवता येते. अत्यंत संयमित, पाल्हाळ नसलेला, विवेचक, वेधक, मार्मिक, विचार चटकदार पध्दतीने कसा लिहावा आपले विचार कसे सुसंगत, सुसुत्रतेने सांगितले पाहिजेत. विचाराची गुंफन कशी असते. विचारातील धागे-दोरे सांभाळून अत्यंत प्रभावी असे लेखन करताना ते परिणामकारक कसे होईल. आपल्या लेखनाचा व विचाराचा हेतू काय? आपले विचार हे साध्य प्राप्त करताना हवा असलेला अत्यंत प्रगल्भ, चिंतनशील विचारपरिलुप्त असा विचार कसा करावा. तो कसा मांडावा विचार मांडण्याचे कौशल्य अवगत करण्याच्या दृष्टीने प्रयोगशील लेखन करावयाचे असेल तर प्रा. अनंत काणेकर यांचे निबंध नव्या निबंधकारांनी वाचले पाहिजे. मराठी साहित्यात अनेक नामवंत निबंधकार झाले आहेत. प्रत्येकाचे निबंध पाहण्यासारखे आहेत. त्यांच्या ग्रंथाचा अभ्यास आपणही एक चांगला निबंधकार व्हावे म्हणून अभ्यास करण्याची गरज आहे. किमान मराठी निबंध लिहिणारे निबंधकार कोण आहेत. त्यांचे कोणते ग्रंथ आहेत ते माहिती झाले तरच आपणास त्यांच्या निबंधाचा अभ्यास करता येईल, म्हणून ग्रंथलेखकाने निबंधकाराची ओळख निबंधाच्या वाचकाला व्हावी म्हणून प्रस्तुत माहिती येथे दिली आहे.

गुजगोष्टीविषयी व त्यातील काही विचार या पूर्वी आपण संदर्भ म्हणून पाहिले आहेतच. त्यांनी लिहिलेले जे निबंध आहेत त्यातील पहिला पांढरा केस, बाजार, पोरखेळ, शाई, हरवली म्हणून सापडली हे निबंध मुळातून वाचण्यासारखे आहेत. या निबंधातून प्रा. ना.सी. फडके यांच्या विचारातील सहजता, साध्या विषयातही त्यांनी पाहिलेले जीवनसौंदर्य, भाषेची ऐट, भाषेला त्यांनी दिलेला ढंग, वरवर साधा वाटणारा विषय पण या विषयाचे गांभीर्य पाहून त्यात भरलेला प्रगल्भ विचार, म्हणजेच विचाराची प्रोढी, जे विचार बौध्दिक आहेत ते साधेसुधे नाहीत तर एका तत्त्वज्ञाने मांडलेले विचार आहेत याची जाणीव त्याचे निबंध वाचताना आपोआप होते. सरळ, साधी, लाघवी अशी गोड भाषा, वाचकांना मोहित करणारी सहज गप्पा मारत आहोत, अशा पध्दतीने त्यांनी केलेले निवेदन नजरेत भरते. आपण जणू गप्पांच्या मैफलीत बसून गप्पाच ऐकत आहोत, असे वाटते. एखादा हुशार माणूस आपले अनुभव सांगत आहे हे ऐकत आहोत, असे वाटते. एखादा हूशार माणूस आपले अनुभव सांगत आहे ते ऐकत रहावे असे वाटते. तसे त्यांचा निबंध वाचताना आपल्या आजूबाजूला अनेकजन बसले आहेत. ते ही मन लावून ऐकत आहेत, असे वाटते. खरे तर कुणीही आपले विचार केंव्हा ऐकतात जेव्हा आपल्याजवळ सांगण्यासारखे काही असते. निबंधकाला तसे लिहिता आले पाहिजे की, ज्यामुळे वाचकाला आपला निबंध वाचण्याचा कंटाळा येणार नाही. तो पुन्हा, पुन्हा वाचेल.



Scanned with OKEN Scanner

MANJARA CHARITABLE TRUST'S

# SMT. SUSHILADEVI DESHMUKH SENIOR COLLEGE, LATUR

## Project Work / Field Work

# CERTIFICATE

This is to certify that,

Mr./Mrs. उफाडे नागनाथ कुंडलिक, शेख नाटेर जलील, एरंडे योगेश धोंडीराम, भास्कर अमृता तुकाराम

has successfully completed the Project Work/Field Work entitled

निबंधकार : लोकमान्य टिळक [१८५६ ते १९२०]

Conducted by the Department of MARATHI in the academic year 2022-23.

Project Guide

Head of the Department

Scanned with OKEN Scanner

सुशीलादेवी देशमुख वरिष्ठ महाविद्यालय, लातूर

शैक्षणिक वर्ष - 2022-23

# "मराठी विभाग"

## प्रकल्प लेखन - Project work

* प्रकल्पाचे शीर्षक *

2] संत साहित्यातील आध्यात्मिक विचार : एक व्यापक

* मार्गदर्शक *

डॉ. शंकरानंद येडले
डॉ. सुरेखा बनकर

प्रकल्पलेखनकार विद्यार्थी

1) बनसूळे सायली अशोक - बी.ए. (प्रथम वर्ष)
2) राठोड विशाल सुरेश - ''
3) झाडे प्रल्हाद फुंजाजी - ''
4) मुनाफे विकास देविदास - ''

Scanned with OKEN Scanner

# "संत साहित्यातील आध्यात्मिक विचार : एक मागोवा"

LATUR

## उद्देश → [Objectives]

- संत साहित्याने सर्वसामान्य माणसाला ऐहिक जीवन जगताना पारमार्थिक जीवनाचे महत्व लक्षात आणून दिले.
- मानवी जीवनाला सांगितलेले विचार हे दीपस्तंभासारखे मार्गदर्शक आहेत.
- भागवतधर्म हा विठ्ठलमय असा वैष्णवांचा धर्म आहे
- आत्मज्ञान प्राप्तीबरोबरच आदर्श जीवन कसे जगावे याची जाणीव संत साहित्यामुळे होते.
- नाममहात्म्य व भक्तिविचारामुळे आध्यात्मिक जीवन प्राप्त करता येते
- विज्ञानयुगातही आध्यात्मिक जीवनाचे महत्व आजही संत साहित्यामुळे लक्षात येते.

## परिणाम / फलनिष्पत्ती (Outcomes) →

- संत साहित्याची चळवळ ज्ञानकाळापासून चालत आली व टिकून राहिली
- संत साहित्याने दिलेले तत्वज्ञान सर्वसामान्य माणसापर्यंत पोहचले.
- भजन, किर्तन प्रवचन या परंपरा संत साहित्याने निर्माण केल्या त्या आजही टिकून आहेत.
- महाराष्ट्रात व अन्य राज्यातही गावोगावी हरिनाम सप्ताह उभे करून सामाजिक प्रबोधनाचे कार्य मोठ्या प्रमाणात संत साहित्यामुळे झाले
- संत साहित्याने विठ्ठल भक्तीचे महात्म्य सांगितले यामुळे कोट्यवधी 'भक्त' 'वारकरी' पंढरपूरला जातात विठ्ठलाचे नाम घेतात.

# संत साहित्यातील अध्यात्मिक विचार : एक सम्यक

मार्गदर्शक

डॉ. शंकरानंद किसनराव येडले
सहयोगी प्राध्यापक व मराठी विभाग प्रमुख
लातूर

**प्रास्ताविक :**

संत ज्ञानेश्वरांनी बाराव्या शतकात वारकरी सांप्रदायाचा पाया रचला. समाजातील सर्व लोकांना भक्तीचे दरवाजे खुली करून बहुजन वर्ग, स्त्रीया, अज्ञानी लोक यासारख्या उपेक्षितांना भक्तीमार्गात आणण्याच्या कार्यात संत नामदेवांनी सहकार्य केले. पुढे संत नामदेवांनी वारकरी सांप्रदायाची चळवळ व्यापक बनवून याचा प्रसार मराठी जनमाणसाबरोबर इतर प्रांतात सुद्धा केला. पिढ्यानपिढ्या अज्ञान, दारिद्र्य उपेक्षितता यात बंदिस्त समाज भक्तीमार्गात आल्याने त्यांना समजेल अशा भाषेत उपदेश करण्याचे कार्य वारकरी संप्रदायातील संतानी केले. भक्तीमार्ग, परमात्मा, मोक्ष, जीव, आत्मा इत्यादी अनेक परमार्थिक बाबींचे ज्ञान संस्कृत भाषेतील ग्रंथात उपलब्ध होते. हे ज्ञान सर्वसामान्यांना समजेल अशा जनसामान्याच्या मराठी भाषेत आणण्याचे अनमोल कार्य संतानी आपल्या साहित्यातून आणले. व अज्ञानी जणांना प्रत्यक्ष मार्गदर्शन, उपदेश करण्याचे कार्यही केले. म्हणून अध्यात्मिक क्षेत्रात संत ज्ञानेश्वरांनी लोकशाही निर्माण केली असे म्हणतात तर पुढील इतर संतानी त्या लोकशाही दृढ करून सर्वसामान्य बहुजनाना अध्यात्मिक उपदेश केला.

संत परंपरेतील संत ज्ञानेश्वर, संत नामदेव, संत एकनाथ, समर्थ रामदास, संत तुकाराम आणि इतर बहुजन मेळ्यातील संतानी सामान्य जनाला समजेल, पचनी पडेल, असे उपदेशपर अनमोल साहित्य निर्मिती करून भक्तीमार्ग सर्वासाठी सुलभ केला. एकंदरीत वारकरी संतानी भक्तीमार्गा साठी. याच बरोबर दैनंदिन जीवन सुखकारक करणारे ज्ञान सामान्यजनांना सहज सोप्या भाषेत उपलब्ध केले. यात भक्ती मोक्ष परमात्मा, ऐहिक कल्याण, परलौकीक कल्याण, सुख, शांती, इत्यादी अनेक संसारीक व पारमार्थिक बाबींना सहज प्राप्त करण्याचे ज्ञान असणारे अनमोल साहित्य खजीना मराठी भाषेत उपलब्ध करून सर्वासाठी खुला ठेवला.

संतानी आपल्या साहित्यातून अनेक विषयावर लेखन केले. त्यात 'अध्यात्म' हा विषय केंद्रबिंदू आहे. 'अध्यात्म' हा विषय अत्यंत सुलभपणे वेगवेगळ्या अभंगातून, वैचारिक ग्रंथातून सर्वच संतानी सांगितला आहे 'अध्यात्म' या बाबतचे सर्व संताचे ज्ञान एकत्रित केल्यास आपल्या समाजाला संतांचे अध्यात्म खऱ्या अर्थाने समजेल ते समजावणे ही आजच्या काळची गरज ठरत आहे

संत साहित्यातून संतानी अध्यात्म हा विषय सुलभ भाषेत सांगितला आहे. धर्म ही बाब समाजाच्या व व्यक्तीच्या बाह्य गोष्टीवर नियंत्रण ठेवण्याचे कार्य करते. तर अध्यात्म हे स्वताबर नियंत्रण हेतून आत्मजागृती, स्वयंमूल्यमापन, सद्भावना, सत्कर्म, नैतिकता यांची शिकवण देऊन उच्चदर्जाचा सात्विक मानवतावादी मानव बनविण्याचा प्रयत्न करते.

अधः म्हणजे अंधार तर आत्म म्हणजे आत्मा होय. म्हणजेच आपल्या आत असलेला अज्ञानरूपी अंधकार नाहीसा करण्याचे कार्य करून ज्ञानरूपी प्रकाशान तेजोमेय करणारे तत्वज्ञान म्हणजे 'अध्यात्म'

Scanned with OKEN Scanner

हाय अध्यात्म हे मन, बुद्धी, इंद्रिय यावर नियंत्रण ठेवून व्यक्तीची आत्मिक, उन्नती करणारे शास्त्र आहे. शास्त्रीय भाषेत सांगायचे म्हणजे मानवी वर्तन व मानसिक प्रक्रियावर नियंत्रण ठेवून त्यात सकारात्मकता निर्माण करणारे शास्त्र आहे असे म्हणता येईल. असे अनमोल ज्ञानभंडार संतानी त्यांच्या साहित्यातून आणि जीवनदर्शनातून सुलभपणे अविष्कृत केले आहे. याचा अखिल मानवजातीला फायदा करून देणे गरजेचे आहे यासाठी संताचे अध्यात्मिक विचारावर अभ्यास/संशोधन करता येईल. कारण की आज विज्ञान युगात सुख, शांती, समाधान हे भौतिक सुखसोयीतून न मिळता, ते फक्त अध्यात्मातूनच मिळू शकते हे स्पष्ट होत आहे. म्हणून संताच्या अध्यातून विचाराला शास्त्राचा दर्जा देवून त्याचा व्यक्तीच्या आत्मिक उन्नती बरोबर सामाजिक स्वास्थासाठी अभ्यास करणे गरजेचे आहे.

**विषय निवडीची भूमिका :**

'अध्यात्म' ही या भूमित अवतरीत झालेल्या महापुरुषांनी, ऋषीमुनीनी संतानी अखिल भारतीय मानव- जातीला व भारतीय संस्कृतीला मिळालेली अनमोल खजिना आहे हजारो वर्षापूर्वी ऋषीमुनीनी अध्यात्मा विषयी खूप संशोधन करून ठेवले आहे परंतू भाषेच्या मर्यादमुळे मराठी जनमाणसाला जीवनविकासाचा, आत्मप्रगतीचा, ऐहिक व पारमार्थिक कल्याणाचा मार्ग सापडत नव्हता. तो मराठी भाषेत आणून आपल्या जीवनदर्शनातून, साहित्यातून समजेल अशा भाषेत अध्यात्म ज्ञान उपलब्ध करून दिले आहे. याचा एकत्रितपणे संकलन / संशोधन करून संताचे अध्यात्म विचार आजच्या उपलब्ध करून देणे गरजेचे आहे. असे मला वाटते. मानव जातीला

आपल्या आत ज्या सुप्त सत्प्रवृत्ती अजागृत अवस्थेत असतात, त्यांना अध्यात्म ज्ञानाने जागृत करता येते व ज्या दुष्प्रवृत्ती आपल्या आत प्रवेश करून वर्तना- त विकृती निर्माण करतात त्यांना समूळ काढण्याचा सुलभ मार्ग म्हणजे अध्यात्म होय हेच अध्यात्म ज्ञान संतानी सांगितले आहे ते जनमाणसापर्यंत पोहचलेले दिसत नाही. ते तळागळातील व्यक्तिणा कल्याणासाठी पोहचणे गरजेचे आहे. यासाठी संताच्या अध्यात्मिक विचाराचे संशोधन करावे असे वाटते.

आजच्या विज्ञान युगात मानवाने ती केली आहे. यशाची उंच-उंच शिखरे पादक्रांत केली आहेत. अशक्य गोष्टी शक्य केल्या आहेत. पण मानवाला विज्ञान शाश्वत सुख, शांती, समाधान, ताण-तणावातून मुक्ती, निर्भयता, आदर्श व सात्विक जीवन जगण्याचे ज्ञान देण्यात असमर्थ आहे. म्हणून विज्ञान जे मानवी कल्याणासाठी करू शकत नाही ते निश्चितपणे ' संताचे अध्यात्मिक विचार' करू शकतात. अध्यात्म हे काही अंधश्रद्धा, बुवाबाजी, ढोंग-पाखंड नसून भारतीय संस्कृतीने हजारो वर्षाच्या संशोधनाने, अनुभव वृध्दीने मानवाचे कल्याण करणाऱ्या ज्ञानाचे ते भंडार आहे. यास आपण विज्ञानाच्या शास्त्रीय कसोट्यावर लावून सिद्ध करू शकतो म्हणून अध्यात्म एक शास्त्र होवू शकते. शास्त्रातारणी उपयुक्तता दिसून येते. म्हणून संताच्या अध्यात्म विचाराची शास्त्रीय मिमांसा करून समाज व व्यक्तीच्या उपयुक्ततेसाठी गरज आहे. असे वाटते.

अर्थकारणाचा, आर्थिक समस्याचा अभ्यासा साठी अर्थशास्त्र आहे समाज व सामाजिक समस्येच्या अभ्यासा- साठी समाजशास्त्र आहे. राजकीय घडमोडी व राजकारणाचा अभ्यास राज्यशास्त्रात होतो. त्याप्रमाणे मानवी वर्तन व मानसिक प्रक्रियेचा अभ्यास मानसशास्त्रात करतात. अशा अनेक सामाजिक बाबींचा अभ्यास करणाऱ्या सामाजिक शास्त्राची संख्या खूप वाढत आहे. त्याप्रमाणे व्यक्तीच्या वर्तन व मानसिक प्रक्रियावर नियंत्रण ठेवून त्यात स्वत्वाचा, विकास व सामाजीक समतोलाची अंतर्दृष्टी देण्याचे कार्य अध्यात्म शास्त्र करू शकते पण याकडे दुर्लक्ष केले जात आहे या संताच्या 'अध्यात्मिक विचाराला

LATUR

Scanned with OKEN Scanner

न्याय देऊन यात संशोधन केले पाहिजे. मानवी कल्याणासाठी याचा उपयोग करणे गरजेचे आहे. या अध्यात्म विचारातून संतानी तत्कालीन समाजाच्या कल्याणासाठी उपयोग केला आहे. या संताच्या विचारांचे संशोधन करून व्यक्ती व समाजाची उन्नती करण्यासाठी व्यक्तीला संताच्या साहित्यातील अध्यात्मिक विचाराचे आचरण करून स्ववर्तन सकारात्मक बदल केल्यासच संताना अपेक्षीत असलेला व्यक्ती व समाज तयार होईल.

अध्यात्म हा शब्द कोणत्याही धर्माच्या चौकटीत बसून नाही. तो तर अमर्याद व व्यापक आहे. सृष्टीतील प्रत्येक मानवाला त्याची आवश्यकता आहे. आज अनेक अज्ञानी लोक धर्माच्या नावाने भांडणे करत आहेत. परंतू धर्म हा मानवाच्या सामाजिक वर्तन, बाह्य विकास, माणुसकीची शिकवण देण्यासाठी व्यापकपणे कार्य करते. पण अध्यात्म आत्मविकासासाठी. समाज उभारणीत सत्प्रवृतीच्या व्यक्तिमत्वाची जडणघडण करून समाजाला व्यक्तीला सुख, शांती समाधा- न प्राप्त करण्याच्या साधनाना व मार्गाने मार्गदर्शन करण्या- चे अनमोल कार्य सदैव करीत आहे हेच कार्य संतानी आपल्यासाठी आयुष्यभर करून पुढील मार्गदर्शनासाठी साहित्याचा खजिना ठेवला आहे या खजिन्यातील 'अध्या- मिक विचाराचे संशोधन / अभ्यास करावा वाटणे इतका हा उपयुक्त व गरजेचा विषय आहे.

आदर्श कुटुंब, समाज, देश उभारणीचे कार्य आदर्श व्यक्तिमत्वाच्या, सत्प्रवृतीचे पालन करणारी, नैतिकता हाच आपल्या जीवनाचा आधार मानणारी, दया, क्षमा, कार्य शांती इत्यादींचा वापर करणारी व्यक्तीच हे महान, करू शकते. अशी व्यक्ती महान करण्यात आजची शिक्षण प्रक्रिया अपयशी ठरत आहे. विज्ञानाला या हैं गोष्टीची शिकवण देतो अशक्य कोटीतील आहे. पण कार्य प्रभावीपणे सामर्थ्य संताच्या अध्यात्मिक विचारात आहे. म्हणून अध्यात्म ज्ञानाचा प्रचार-प्रसार करण्याची गरज आहे. यासाठी सामान्यजनांना पेलणारे समजणारे अनरण्यास सुलभ असणारे अध्यात्मिक विचार संत साहि- त्यातून मिळू शकते. तत्कालीन संतानी या ज्ञानाचा उपयोग करूने आपले जीवनविकास कसा करायचा याची शिकवण समाजाला दिली. ही शिकवण आजच्या समाजासाठी आवश्यक आहे. संताचे अध्यात्मिक विचार सर्वां पर्यंत पोहचणे गरजेचे वाटत आहे.

आज समाजातील प्रत्येक व्यक्ती शिक्षण, ज्ञान घेताना त्याची उपयुक्तता पाहतो. म्हणून संतप्या, साहित्याचा व विचारांचा अभ्यास करण्यासाठी तरुणपिढी उपयुक्ततेचा अभाव आहे असे म्हणते. परंतू संतानी मानवी कल्याणासाठी अनमोल साहित्य निर्मितीचा ठेवा ठेवला आहे. त्यात अनेक उपयुक्त विषयांचे सखोल ज्ञान मिळते. त्यातील 'अध्यात्मिक विचार हा केंद्रबिंदू असून त्याची गरज व्यक्ती, समाज, देश यास आहे. ही गरज कशी महत्वपूर्ण आहे पटवून देणे आवश्यक आहे. संताचे अध्यात्मिक विचार सामाजीक, धार्मिक वैयक्तिक आहेत याचा प्रचार-प्रसार होणे दीर्घकालीन फायदेशीर ठरणारे आहे. म्हणून संताच्या साहित्यातील 'अध्यात्मिक विचारां चे करून शकतील तेवढे अभ्यास/संशोधन केले पाहिजे असे वाटते.

**विषयाचा हेतू :-**

संतानी साहित्यातून जे मानवी कल्याण, उन्नती, व्यक्ती वर्तन सुधारणे सोबत परलौकिक व ऐहिक विकासासाठी ज्ञान मांडले हे ज्ञान भारतीय संस्कृतीचे मूळ आहे ते मराठी भाषेत संत साहित्यातील अध्यात्मिक विचारात दिसते. त्याच बरोबर संतानी आपल्या जीवनदर्शनाने, विचाराने कृतीने, अनुभवाने मिळालेल्या ज्ञानाचा ठेवा आपणास दिला आहे. त्यातील अध्यात्म विचारांचा हेतू म्हणजे मानवाची अध्यात्मिक प्रगती करून त्यास एक आदर्श नैतिक, निष्काम वृत्तीने समाज उभारणीसाठी उभा करणे.

LATUR

Scanned with OKEN Scanner

व मानवाचे ऐहिक व परलौकिक कल्याण करणे हा संताच्या अध्या त्मिक विचाराचे संशोधनाचा हेतू आहे. संतानी सुलभ भाषेत अभंगवाणीतून, वैचारिक ग्रंथातून अध्यात्मिक विचारां- ची मांडणी केली आहे ती एकत्रीत व सूत्रबद्धपणे, समाज, व्यक्ती, देश याच्या कल्याणासाठी उपलब्ध करणे हा विषय निवडी मागील हेतू आहे.

संताचे अध्यात्मिक विचार ही आजच्या महत्वपूर्ण गरज आहे. कारण की मानवी समस्यांची उकल या विचाराने होऊ शकते. निर्माण होणाऱ्या समस्या थांबू शकतात. अनेक समस्या मानव निर्मित असतात. व्यक्तीच्या विकार, विकृती हे समस्येचे मूळ आहे. काम, क्रोध, लोभ, द्वेष यांची विकृती मानवाच्या वि नाशास कारणीभूत असते, यावर नियंत्रण ठेवून यांच्यात सकारात्मक बदल करण्यासाठी अध्यात्मिक विचाराचीच गरज आहे. म्हणून मानवी विकार, विकृती दूर करण्यासाठी। अध्यात्माचा वापर केल्यास मानवाला सुख शांती समाधान देण्याचा हेतू फक्त संताचे अध्यात्मिक विचारच पूर्ण करू शकतात.

**विषयाचा उद्देश :**

तेथे विज्ञान-तंत्रज्ञान, भौतिक वस्तू, डॉक्टर शास्त्रज्ञ इत्यादी बाबी एखाद्या व्यक्तीच्या वैयक्तिक समस्या, विकार, विकृती, मानसिक असमतोलपणा इत्यादी बाबी दूर करण्यासाठी प्रयत्नांची पराकाष्ठा करूनही अशक्य असते. तेथे अध्यात्म प्रभावी कार्य करून व्यक्तीच्या अनेक समस्येवर उपाय सांगून व्यक्तीच्या अंतरिक समस्येचे समूळ उच्चाटन अध्यात्म करू शकते. हे संतानी आपल्या जीवनदर्शनाने व साहित्यातील विचारातून आपणास सांगण्याचा प्रयत्न केला आहे. त्याचा हा प्रयत्न आजही यशस्वी करण्यासाठी संताच्या अध्यात्मिक विचाराचा अभ्यास करण्याचा मूळ उद्देश आहे. संताच्या या विचाराने व्यक्तीचा अंतरिक विकास पर्यायाने समाज व देशाचा विकास करून सर्वांना आत्मिक सुख, शांती, शाश्वत आनंद, विकार व विकृतीतून मुक्ती देण्याचा उद्देश संताच्या अध्यात्मिक विचारातून सफल होऊ शकतो.

सक्ती हा कुटुंब, समाज, देश यातील महत्वा चा घटक असतो, त्याच्या वर्तनाचा प्रभाव कुटुंब, समाज देश यावर पडत असतो, तर देश, समाज, कुटुंब यात, आमुलाग्र सुधारणा करण्यासाठी व्यक्तीची अंतरिक दृष्टी सुधारली पाहिजे हे व्यक्ती सुधारणेचे अंतरिक व बाह्य कार्य संताचे अध्यात्मिक विचार करू शकतात. म्हणजेच व्यक्तीला अंतरिक व बाह्य शुद्धी करण्याचा उद्देश संताचे अध्यात्मिक विचार करू शकतात.

मनाच्या ठिकाणी अभांग अशी शक्ती असते मनाला विकार व विकृती पासून दूर ठेवून सुसंस्कारीत करण्याचे कार्य संताच्या विचार व कृती पाहील्याने होवू शकते. अध्यात्माने सुसंस्कारीत झालेले मन व्यक्तिविकासो- साठी खूप मोठे योगदान देवू शकते. मनाला सुसंस्कारीत करण्याचे कार्य संताचे अध्यात्मिक विचार करू शकतात.

**विषयाचे सामर्थ्य :**

संत साहित्यातील अध्यात्मिक विचार, एक सम्यक अकलन या विषयावर संशोधन झाल्यास संतांचे अनमोल अध्यात्मिक विचाराचा सार एकत्रीत पणे सर्वांना समजेल हा अध्यात्मिक विचार व्यक्तीविकास व समाजविकासात महत्वपूर्ण योगदान देणारा असून व्यक्तीची आत्मिक उन्नती, विकार, विकृती पासून दूर ठेवणे. मनावर व इंद्रियावर नियंत्रण ठेवून बुद्धीला सकारात्मक बनवून सत्कर्म,

LATUR
Scanned with OKEN Scanner

निष्काम कर्म, नैतिकता इत्यादी बाबीकडे व्यक्तीला अंतरिक दृष्टीने वळविण्याचे सामर्थ्य संतांच्या अध्यात्मिक विचारातून आपणास मिळू शकते त्याच बरोबर व्यक्तीचा दीर्घकालीन विकास म्हणजे ऐहिक व परलौकिक कल्याण यातूनच होऊ शकते. याची आजच्या समाजाला गरज ही सध्या सर्वत्र दिसत आहे ती पूर्ण करण्यास संताचे अध्यात्मिक विचार सक्षम आहेत.

आजच्या विज्ञान युगात मानव दिवसेंदिवस अनेक सुखांच्या यत्नांनी प्राप्ती करीत आहे तरी मानव आपल्या जीवनात ताण-तणाव, अशांती, अतृप्ती, न संपणारा भोगवाद, अतिरेकी काम क्रोध, द्वेष यातून येणाऱ्या भयानक समस्या यात अडकत चालला आहे. यावर विविध उपाय योजना करूनही समस्या न संपता त्याची तीव्रता व स्वरूप उग्र रूप धारण करत आहे. या समस्या कमी करण्याचे सामर्थ्य संताच्या अध्यात्मिक विचारात आहे. संतकालीन समाजात या समस्या दिसत नव्हत्या कारण की संत समाजाच्या कल्याणासाठी आपले आयुष्य खर्ची घालत असत.

आज काही लोकांना अध्यात्म हा अंधश्रद्धे चा विषय वाटतो अध्यात्माचा अभ्यास करणे, त्यानुसार मानसिक विचार, वर्तन, अचरण ठेवणे म्हणजे फालतूपणा वाटतो पण खरे तर अध्यात्मिक विचारांचा मानवी कल्याणासाठी शास्त्रीय दृष्टीने विचार केला तर उपयुक्ततेचे शास्त्र ठरावे एवढे सामर्थ्यवान विचार संतानी अध्यात्मिक विचारात सांगण्याचा प्रयत्न केला आहे असे दिसून येते.

समाजातील व्यक्ती, कुटुंब यांना खऱ्या अर्थाने चिरकालीन सुख, शांती, आत्मिक उन्नतीची शिकवण देण्याचे सामर्थ्य या विषयात आहे. त्याचबरोबर व्यक्तीला नैतिक, निष्काम कर्म, निस्वार्थी बनवून परोपकारी- भूतदयावादी, सहिष्णू, मानवतावादी विचारसरणीचे बीजारोपण करून त्यास खतपाणी घालणे, रोगराई व तण नियंत्रण करून एक विशाल वृक्ष रूपी मानवी विचार बनवून येणाऱ्या पिढ्यांना सत्कर्माची, नैतिकतेची, सर्वांगीण कल्याणाची मधूर फळे देण्याचे सामर्थ्य संताच्या विचारातून मिळू शकते.

समाजात चालणारे ढोंग, पाखंड, अंधश्रद्धा, बुवाबाजी यास अध्यात्मिक आधार आहे काय ? यातून व्यक्तीचे अहित कसे होते याची अंतरिक ज्ञानदृष्टी. देण्याचे सामर्थ्य आज संताच्या साहित्यातून व्यक्त झालेल्या अध्यात्मिक विचारात आहे.

**विषयाच्या मर्यादा :**

आजच्या विज्ञानवादी मानवाला देव, भक्ती, मोक्ष, परलौकीक कल्याण इत्यादी विषय हे अनावश्यक वाटतात. यासाठी आपला अमूल्य वेळ खर्च करणे म्हणजे अंधश्रध्देला खतपाणी घालण्यासारखे असे वाटत असते. मुळातच भारतीय संस्कृतीला भव्य दिव्य बनवून जगाला आदर्श निर्माण करणाऱ्या संत, महापुरुष, ऋषीमुनी, महान ग्रंथ इत्यादींवर शंका घेतली जाते. त्याच्या सखोल अभ्यास न करता टिका केली जाते. अशा शंका कुशंका घेणाऱ्या व्यक्ती संताचे अध्यात्मिक विचारांचे अकलन होणार नाही. अकलन न झाल्याने आत्मअनुभवाची प्रचिती घेणार नाही. त्यामुळे हा विषय सर्वांना समजण्यास मर्यादा येतील.

आजचा मानव सुखासाठी भौतीक सुख-सोयींच्या मागे धावत आहे. हे धावणे न संपणारे असूनही यातून आत्मिक सुख, शांतीचा पूर्णतः अभाव आहे. आपण चुकीच्या मार्गाने जात आहोत. हे काहींना खूप उशीरा समजते. तेव्हा ते ताण-तणावाच्या दडपणाखाली कोठेतरी बुवाबाजीचा बळी पडून खऱ्या अध्यात्मिक विचारापर्यंत पोहचणे दुर्मिळ होत आहे.

Scanned with OKEN Scanner

LATUR

आज सर्वत्र संत, महापुरुष यांना पूज्यनीय मानतात. आपआपल्या परीने भक्ती करताना दिसत आहेत. परंतू संत महापुरुषाचे विचार मानणे, विचारानुसार कृतीशील आचरण करणे, दैनंदिन जीवनात हे विचारातून वर्तनातून दिसणे महाकठीण वाटते. त्यामुळे हे कार्य, वर्तन, विचार आपल्या अवाक्याबाहेरील नसून हे फक्त संत-महापुरुषांच्या सारख्यांनाच शक्य आहे. आपण सामान्य संस्कारिकता नसलेले संसारीक जीव आहोत म्हणून दूर पळतात. अशा पळणाऱ्या व वर्तनातून अंतरीक प्रचिती न घेणाऱ्या व्यक्तींना हे विचार समजणे कठीण आहे.

आज दिसते त्यावर विश्वास ठेवला जातो. आपण एखादी वस्तू, शक्तीवर बोलत असू तर ते प्रथम ती वस्तू, शक्ती प्रत्यक्ष दाखवा म्हटले जाते किंवा तीचे अस्तित्वात सिध्द करा असे म्हटले जाते. त्या प्रमाणे संताच्या अध्यात्मिक विचारात अनेक बाबींचे अस्तित्व सिध्द करून दाखवण्यात मर्यादा येतात. अध्यात्म हे अनुभवाच्या प्रचितीचे शास्त्र हा विचार सर्वांना पटेल असे नाही.

Scanned with OKEN Scanner

LATUR

MANJARA CHARITABLE TRUST'S

# SMT. SUSHILADEVI DESHMUKH SENIOR COLLEGE, LATUR

## Project Work / Field Work

# CERTIFICATE

This is to certify that,

Mr./Mrs. बनसूळे सायली, राठोड विशाल, झाडे प्रसाद, सुनापे विकास

has successfully completed the Project Work/Field Work entitled

संत साहित्यातील आध्यात्मिक विचार : एक सम्यक

Conducted by the Department of मराठी in the academic year 2022-23.

Project Guide

Head of the Department

Scanned with OKEN Scanner

श्रीमती सुशीलादेवी देशमुख वरिष्ठ महाविद्यालय, लातूर

शैक्षणिक वर्ष - 2022-23

LATUR

मराठी विभाग

प्रकल्पलेखन → Project work

*****

प्रकल्पाचे शीर्षक →

3] डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे शैक्षणिक विचार.

* मार्गदर्शक *

डॉ. शंकरानंद येडले
डॉ. सुरेखा बनकर

प्रकल्पलेखनकार विद्यार्थी

1) देशमुख कार्तिक रामकिशन - बी.ड. (द्वितीय वर्ष)
2) शेख शबनम मुस्तफा - "
3) फाझी तौफिक फिरोजअहमद - "
4) वाघमारे विशाल वैजनाथ - "

प्रकल्पविषय → ३]
↓
डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे शैक्षणिक विचार

LATUR

उद्देश →

१] शिक्षण हे सर्वांगीण विकासाचे प्रवेशद्वार आहे.
२] 'शिक्षण' सामाजिक परिवर्तनाचे माध्यम आहे.
३] शिक्षणामुळेच व्यक्तिचा विकास होता
४] शिक्षणामुळे आपल्या जाणीवा प्रगल्भ होतात.
५] सर्वांसाठी शिक्षण एक आवश्यक गरज आहे.
६] सर्वोत्तम आदर्श समाज शिक्षणामुळे घडतो
७] शिक्षणामुळे सद्गुणांचा विकास होतो.
८] संत समाजसुधारकांनी शिक्षणाचा आग्रह धरला.

परिणाम / फलनिष्पत्ती →

१] डॉ. आंबेडकरांनी सांगितलेले शिक्षणाचे महत्त्व लक्षात आले.
२] वाचन व अभ्यासामुळे आपला दृष्टीकोन बदलतो याची जाणीव झाली.
३] डॉ. आंबेडकरांचे शैक्षणिक विचार समजले
४] म. फुले, डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे सामाजिक व शैक्षणिक विचार समजले / लक्षात आले.

Scanned with OKEN Scanner

प्रकल्प लेखनकार विद्यार्थी →
1) देशमुख कार्तिक रामकिशन
2) शेख शाबनम सुरतमिया
3) काझी तौफिक फिरोजअहमद
4) वाघमारे विशाल वैजनाथ

## डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे शैक्षणिक विचार

प्रा.डॉ. शंकरानंद पेडले लातूर

LATUR

डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचा जन्म १४
एप्रिल १८९१ रोजी मध्यप्रदेशात , इंदोर जवळच्या महू येथील लष्करी छावणीत झाला. त्यांच्या वडिलांचे नाव रामोजी मालोजी सपकाळ होते. आईचे नाव भीमाबाई होते.डॉ. आंबेडकरांचे वडिलकबीरपंथी होते. त्यांना ज्ञानाविषयी, शिक्षणाविषयी खूप खूप, आस्था व प्रेम होते. आपल्या मुलामध्ये शिक्षणाची आवड
निर्माण व्हावी म्हणून खूप प्रयत्न केले.
डॉ.आंबेडकर म्हणतात " मला माझ्या वडिलांचा अभिमान वाटतो. त्यांच्यासारखे
वडील मला लाभले हे मी माझे भाग्य समजतो. त्यांनी माझ्या शिक्षणासाठी खूप परिश्रम घेतले. त्यांनी शिक्षणांसाठी च्या सुखसोयी उपलब्ध करून दिल्या.मी त्यांना एखादे पुस्तक मागितले,की ते संध्याकाळपर्यंत कोठून तरी आणून देत.
परीक्षेच्या काळामध्ये मी पहाटे दोन वाजता
जागे व्हावे म्हणून ते रात्री दोन वाजेपर्यंत झोपत नसत. ते आम्हा भावडांकडून, रामायण, महाभारत, संताचे अभंग, व कबीराचे दोहे वाचून घेत. त्यामुळे आमच्यावर चांगल्या विचाराचे संस्कार झाले. ते मला म्हणत' आम्ही गरीब असलो तरी, तू विद्वान का होणार नाहीस ? तू देखील विद्वान होणार " त्यांच्या या वाक्याचा
माझ्या मनावर फार खोल परिणाम झाला.त्यांनी मला, शब्दांचा तोलून -मापून उपयोग करावा हे शिकविले.
शिक्षण विषयक अत्यंत मौलिक विचार डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी सांगितले आहेत. ते म्हणतात "ज्या प्रमाणे अंधारातून उजेड, अशुभातून शुभ,व निराशेतून दैवी आशा फुटते. तद्वतच आपल्या या अज्ञान समाजातून सज्ञान, अशक्तातून सशक्त बनून, प्रकाशमान दिवे होऊन, आप आपल्या ज्ञानबंधूस, खरे मर्गदर्शक व्हा. असा विचार मुकनायक मधील आमचा संदेश या लेखात डॉ. बाबासाहेबानी दिला आहे.
"शिका, संघटीत व्हा आणि संघर्ष करा असा शिक्षणविषयक मुलमंत्र देण्याबरोबरच शिक्षण हे वाघीणीच दुध आहे.जो पिईल तो गुरगुरल्याशिवाय राहणार नाही . शिक्षणाचे जे महत्त्व आहे ते वेळोवेळी मांडलेल्या विचारातून डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे

Scanned with OKEN Scanner

मौलिक असे शैक्षणिक विचार अविष्कृत झाले आहेत. त्यांचे प्रत्येक विचार हे सुभाषितांचे मोल असलेले एक अनमोल असे एक धन आहे.

शिक्षण ही अशी बाब आहे.जी प्रत्येक माणसापर्यंत पोहचली पाहिजे. शिक्षण इतके स्वस्थ असायला हवे की, गरीबातला गरिब माणूस सुद्धा सहजपणे शिक्षण घेऊ शकला पाहिजे.किंबहुना आपण गरिब असलो म्हणून काय झाले. आपण शिकू शकतो हा आत्मविश्वास हवा. शिक्षण श्रीमंतानाच घेता येते. गरीबांना शक्य नाही असे समजण्याचे कारण नाही. अंत्यत गरीबीतही जिद्दीने शिकता येते हा आदर्श स्वतः डॉ. बाबासाहेबांनी जगासमोर ठेवला असून जगातल्या आदर्श शंभर विद्यार्थ्यां मधील एक नंबरचे आदर्श विद्यार्थी म्हणून अमेरीकेतील कोलंबीया विद्यापीठाने डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचा गौरव केलेला आहे. संपूर्ण जगात भारत देशाला नावलौकीक मिळवून देणारे भूषणावह असे कार्य करण्याबरोबरच डॉ. आंबेडकराचे विचार पदोपदी सर्वच क्षेत्रात दिपस्तंभासारखे दिशादर्शक, मार्गदर्शक असे आहेत.

कोणत्याही समाजाची उन्नती ही त्या समाजाच्या शिक्षणांच्या प्रगतीवर अवलंबून असते. समाजाच्या सर्व प्रश्नांना सोडविण्पासाठी शिक्षण हेच एकमेव जालीम औषध आहे. म्हणून शिक्षणांकडे पाहिले पाहिजे.

या शिवाय शिकलेल्या माणसांतील दोष सांगताना डॉ.आबेंडकर म्हणतात ' तो शिकूण नौकरी करू लागल्यावर आपल्या बायको मुलाची काळजी घेतो. तो समाजाचे हित पहात नाही.आपल्या हिताबरोबर समाजाचेही हित आपल्यातील शिकलेल्या व नौकरीवर असलेल्याने पाहिले पाहिजे. त्या शिवाय आपल्या समाजाची प्रगती होणार नाही. याची गंभीर जाणीव डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी करून दिली आहे याचे कारण, ' प्रथम लोंकाच्या विचारात क्रांती करावी लागते. मग आचारात क्रांती येते.ते कसे हे डॉ.आंबेडकरानी दाखवून दिले आहे

विद्यार्थी दशेत विद्या प्राप्त करण्यासाठी कसून झटने ही उत्कृष्ट व समाधानाची गोष्ट आहे. पंरतु त्याचबरोबर समाज सुधारणेच्या कार्याची धुरा त्यांनी आपल्या खांद्यावर घेतलीच पाहिजे.याची जाणीव ही शिकलेल्या विद्यार्थी बांधवास असावी असे

LATUR

Scanned with OKEN Scanner

डॉ. बाबासाहेब सांगतात.

वस्तुत: विद्ये विषयी लिहितांना डॉ. बाबासाहेब म्हणतात ' विद्या हे एक दुधारी अस्त्र आहे.ज्याच्या जवळ विद्येचे अस्त्र असेल आणि तो शीलवाण असेल तर त्याजोगे तो एखाद्याचे संरक्षण करील.परंतु तोच इसम शीलवान नसेल तर विद्येच्या शस्त्राने तो दुसऱ्याचा घात करील.'

विद्येचे विशेष महत्व विशद करतांना डॉ. बाबासाहेब म्हणतात ' माझ्या मते केवळ विद्याच पवित्र असू शकत नाही.विद्येबरोबरच भगवान बुध्दानी सांगितलेली प्रज्ञा म्हणजे शहाणपणा , शील म्हणजे सदाचाराने संपन्न असे आचरण,करुणा म्हणजे सर्व मानव जातीसंबधी प्रेमभाव आणि मैत्री म्हणजे सर्व प्राणी मात्राविषयी आत्मियता या चार परमिता असल्या पाहिजेत तरच विद्वतेचा उपयोग आहे.

आपण शिकलो म्हणजे सर्व कांही झालो असे नाही. शिक्षणाचे महत्व आहे यात शंका नाही. मात्र शिक्षणा बरोबरच माणसाचे शीलही सुधारले पाहिजे. शीला शिवाय शिक्षणांची किमत केवळ शुन्य आहे.ज्ञान हे तलवारीसारखे आहे. तिचा सद्उपयोग की
दुरूपयोग करावयाचा हे त्या माणसाच्या शीलावर अवलंबून राहील.
विद्यार्थ्यांनी काय करावे या विषयी डॉ बाबासाहेब म्हणतात ' विद्यार्थी वर्गाने दोन गोष्टी ध्यानात ठेवल्या पाहिजेत, बुद्धिमत्तेत
आणि कार्यक्षमतेत कमी पडणार नाही याची दक्षता घेतली पाहिजे तसेच व्यक्तिगत सुखापेक्षा आपला समाज स्वतंत्र, स्वावलंबी,व सन्माननिय कसा होईल याकडे सर्वांनी लक्ष पुरविले पाहिजे.

आपणास काय हवे हे सांगताना डॉ. बाबासाहेब म्हणतात ' आम्हाला स्वाभिमानाचे जीवन हवे आहे. त्यात दारिद्र्य प्राप्त झाले तरी हरकत नाही. खायला प्यायला मिळतय हा प्रश्न महत्वाचा नाही. स्वाभिमानाच्या जीवनाला खरे महत्व आहे.किडा मुंगीचे जीवन आम्हाला नको आहे.

शिक्षणापेक्षा शीलाला अधिक महत्व द्या.

तसेच आपल्या शिक्षणाचा उपयोग आपल्याच दिनदुबळ्या जनतेच्या उद्धारार्थ न करता जर शिकून आपली नौकरी भली, आपली बायको मुले भली या भावनेने आजचे शिकलेले तरुण वागणार असले तर याचा समाजाला काय उपयोग ? तरुणावर आज पडलेली जबाबदारी ओळखून त्यानी त्या कार्यास लागावयास हवे आहे.

खरे तर तुमचा उद्धार करण्यास कोणीही येणार नाही. तुम्ही मनात आणाल तर तुमचा उद्धार तुम्हीच करण्यास समर्थ व्हाल.

ज्या माणसाला आपल्या कृतीचे फळ मिळते. त्यास उत्साह प्राप्त होतो.

Scanned with OKEN Scanner

LATUR

आपल्या सर्वांसाठी आपल्या जवळ असलेला आत्मविश्वास हा अत्यंत महत्वाचा आहे.म्हणून डॉ.बाबासाहेब आंबेडकर म्हणांतात ' आत्मविश्वासासारखी दुसरी दैवी शक्ती नाही. आम्ही आमच्यातील आत्मविश्वास गमावता कामा नये. उदाहरणार्थ कुस्ती खेळण्यासाठी आखाड्यात उतरलेल्या पैलवानाने दुसऱ्याच्या ठणठणीत दंड थोपटल्याने घाबरून गर्भगळीत झाल्यास त्याच्या हातून काही तरी होणे शक्य आहे काय ?

आपण शिकलो पदवी मिळवली म्हणजे यश प्राप्त झाले असे होत नाही म्हणून डॉ.बाबासाहेब आंबेडकर म्हणतात " दीर्घोद्योगी व कष्ट करण्यानेच यश प्राप्ती होते. नुसत्या पदव्या मिळवल्याने काही होणार नाही. कारण पदव्या म्हणजे ज्ञान नसून शिक्षकाच्या मदतीशिवाय ज्ञानार्जन करण्यात जमविलेली साधनसामुग्री होय.

शिक्षणामुळे प्राप्त होणारे ज्ञान हे पवित्र मानले जाते. हे लक्षात घेऊन सत्य,असत्य समजून घेतले पाहिंजे.

लबाडी करण्यास चातुर्य व बुध्दी लागते. चातुर्य व बुध्दीला सदाचाराची अर्थात शीलाची जोड मिळाली तर तो लबाड्या अगर फसवाफसवी करु शकणार नाही. आणि म्हणून शिकल्या सवरलेल्या लोकात शीलाची अंत्यत जरुरी आहे.शीलाशिवाय शिकले सवरलेले लोक निपजू लागले तर त्यांच्या शिक्षणातच समाजाचा व राष्ट्राचा नाश आहे. असे सांगून विद्येचे महत्व सांगताना डॉ. बाबासाहेब म्हणतात

"विद्या ही तलवारीसारखी दुधारी आहे. परंतु
तिचे महत्व तिला धारण करणाऱ्या वर अवलंबून राहिल. " याचे कारण अडानी मनुष्य कोणास फसवू शकत नाही. फसवावे कसे हेच त्याला उमगत नाही. परंतु शिकल्या सवरलेल्या लोकांच्या ठिकाणी कोणास कसे फसवावे व त्याला फसविण्यासाठी लागणारा युक्तिवाद असल्याने खऱ्याचे खोटे व खोटयाचे खरे ते भासवू शकतात. याची गंभीर जाणीव डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी करुन दिली आहे.

बौद्धिक पातळी का खाली घसरली याचा विद्यार्थ्यांनी विचार करणे आवश्यक आहे. आणि या परागतीचे कारण अगदी स्पष्ट आहे. आजचा विद्यार्थी वर्ग भूतकालीन प्रज्ञावंत आणि प्रतिभावंत यांच्या तत्व, ज्ञान व वाड्मयकृतीचा अभ्यास मन लाऊन करीत नाही.

विद्या ही अन्नासारखी सर्व मनुष्यास आवश्यक आहे. प्रत्येकास तिचा लाभ झाला पाहिजे.हा उदात्त विचार पहिल्यांदा उद्घोषीत केला असेल तर तो भगवान बुध्दानीच. असे सांगून आत्मगत विचार व्यक्त करतांना डॉ. बाबासाहेब आंबेडकर म्हणतात." माझे पहिले आणि श्रेष्ट गुरु बुद्ध होय.मी दहा

Scanned with OKEN Scanner

LATUR

बारा वर्षाचा असतांना माझे वडिल कबीर पंथी साधू होते. हे मला तेंव्हा पासून आठवत. माझ्या वाडिलाचे घर धर्मासन म्हणता येईल. तसेच विद्यासन असेही म्हणता येईल. माझे वडिल विद्येचे भक्त होते. तसेच ते धर्माचे चाहते होते. माझ्या लहाणपणी रामायण, महाभारत, इ.सर्व ग्रंथाचे त्यानी पारायणे करवून घेतले होती. रामायण, महाभारत वाचून माझ्या मनावर फार मोठा परिणाम झाला. माझे वडिल मला म्हणत आपण गरीब असलो म्हणून भिण्याचे कारण नाही. तू विद्वान का होऊ शकणार नाहीस.? .

माझे दुसरे गुरु कबीर होय. आणि तिसरे गुरु म्हणजे जोतिबा फुले. यांच्या शिकवणीने माझे आयुष्य बनले आहे.

मुकनायक मधील आमचा संदेश या लेखात

डॉ. बाबासाहेब आबेंडकर म्हणतात " जे झाले ते गेले, जे होणार ते जाणार, म्हणून आज जिवंत असलेली तुम्ही चाललेली घडी वाया जाऊ न देता, पुढे व्हा, आणि आपल्या ज्ञात बांधवास हात द्या. व आपल्या बरोबरीने पुढे आणून जगा मध्ये आपले नाव करून दाखवा. हा प्रेरणादायी संदेश डॉ. बाबासाहेब आबेंडकरानी दिला आहे . संत वचनांचा संदर्भ त्यांनी दिला आहे.

" आपला आपण करावा विचार

तरावया पार भव सिंधु "

आपणास आपली उन्नती करावयाची असेल तर आपण हे समजून घेतले पाहिजे की, मनुष्याच्या बुध्दीवर, उत्तम, मध्यम, किंवा कनिष्ठ अशा विचारांचा संस्कार घडतो. त्या प्रमाणे तिच्या योग्यते प्रमाणे,ती, उत्तम, मध्यम किंवा कनिष्ठ मार्गास लागते. या दृष्टिने पडित जमिनीचा दृष्टांतही मनुष्याच्या बुध्दीला बऱ्याच अंशी लागू पडतो. ज्या प्रमाणे पडित जमिनीस खत वगैरे घालून तिची मशागत करावी,त्या प्रमाणे ती पिकाऊ होते. असेच मनुष्याच्या बुध्दीचे आहे. म्हणजे जसा तिजवर संस्कार होतो, जशी तिची योग्यता असते तशी ती होते. सर्व मनुष्याची बुध्दी अगदी सारखीच नसते, तथापि कोणत्याही मनुष्याच्या बुध्दीवर योग्य संस्कार झाला असता त्याजपासून कांही तरी फल प्राप्ती झाल्यावाचून राहत नाही.

असे विचार मुकनायक मधील उन्नतीचे साधन या लेखात डॉ बाबासाहेब आंबेडकर

LATUR

यांनी मांडले आहेत.

अभ्यास पूरक संदर्भ

०१) डॉ. बाबासाहेब आंबेडकर, माझी आत्मकथा.

०२) प्राचार्य डॉ रा तु भगत. शिक्षणातील थोर विचारवंत

०३) डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे सुविचार संपादन गजानन वानखेडे.

०४) मूकनायक आणि बहिष्कृत भारत अग्रलेख : डॉ. बाबासाहेब आंबेडकर.

०५) बा. ह. कल्याणकर, डॉ.आंबेडकरांचा शैक्षणिक दृष्टिकोन.

०६) डॉ. बाबासाहेब आंबेडकर, लेखन व भाषणे. महाराष्ट्र शासन मुंबई.

---

Scanned with OKEN Scanner

MANJARA CHARITABLE TRUST'S

# SMT. SUSHILADEVI DESHMUKH SENIOR COLLEGE, LATUR

## Project Work / Field Work

### *Certificate*

This is to certify that,

Mr./Mrs. देशमुख कार्तिक रामकिशन, शेख अदनान मुस्तफा, काझी तौफिक फिरोजखान वाघमारे विशाल देवानंद

has successfully completed the Project Work/ Field Work entitled

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे शैक्षणिक विचार

Conducted by the Department of मराठी in the academic year 2022-23.

Project Guide

Head of the Department

Scanned with OKEN Scanner

श्रीमती सुशीलादेवी देशमुख वरिष्ठ महाविद्यालय, लातूर

शैक्षणिक वर्ष - 2022-23

"मराठी विभाग"

प्रकल्प लेखन - Project work.

← प्रकल्पाचे शीर्षक →

↓

४) मराठी साहित्यातील निबंधकार

* मार्गदर्शक *

डॉ. शंकरानंद येडले
डॉ. सुरेखा बनकर

प्रकल्पलेखनकार विद्यार्थी

1) सुरवसे संदीप दिलीप - बी.ए (तृतीय वर्ष)
2) कांबळे सुमेध दयानंद - "
3) लोमटे वैष्णवी महादेव - "
4) राठोड पुष्पा सुभाष - "
5) डिकळकर निसार मुस्तफा - "

Scanned with OKEN Scanner

"मराठी साहित्यातील निबंधकार"

LATUR

उद्देश → १) ललित साहित्याचे स्वरूप कळणे.
२) ललित साहित्यातील निबंधाचे महत्त्व लक्षात घेणे.
३) ललित निबंध वाङमय प्रकाराची ओळख होणे.
४) ललित निबंध लेखकाची लेखनशैली समजून घेणे.
५) वैचारिक, प्रबोधनपर विचार आत्मसात करणे.
६) निबंध वाचनाची अभिरुची निर्माण करणे.
७) वैचारिक साहित्याचे आकलन व मूल्यमापन करणे.

परिणाम /फलनिष्पत्ती →

१) ललित साहित्याचे वेगळेपण लक्षात आले.
२) सामाजिक प्रबोधनात निबंधाचे महत्त्व असते हे कळले.
३) विचारप्रवर्तक जाणीव निर्माण झाली.
४) वैचारिक साहित्याची आवड वाढली.
५) साहित्यलेखनातील सौंदर्यविचार लक्षात आला.
६) विद्यार्थ्यांच्या भावनात्मक, संवेदनशील तात्त्विक व वैचारिक विचाराला दिशा प्राप्त झाली.

---

Scanned with OKEN Scanner

# मराठी साहित्यातील निबंधकार

डॉ. शंकरानंद किसनराव येडले
सहयोगी प्राध्यापक व मराठी विभाग प्रमुख
श्रीमती सुशीलादेवी देशमुख वरिष्ठ महाविद्यालय, लातूर-४१३ ५१२
मो. ९४०३०११९७२

मराठी साहित्यात अनेक नामवंत निबंधकार झाले आहेत. प्रत्येकाचे निबंध पाहण्यासारखे आहेत. त्यांच्या ग्रंथाचा अभ्यास आपणही एक चांगला निबंधकार व्हावे म्हणून अभ्यास करण्याची गरज आहे. किमान मराठी निबंध लिहिणारे निबंधकार कोण आहेत. त्यांचे कोणते ग्रंथ आहेत, ते माहिती झाले तरच आपणास त्यांच्या निबंधाचा अभ्यास करता येईल म्हणून ग्रंथलेखकाने निबंधकाराची ओळख निबंधाच्या वाचकाला व्हावी म्हणून प्रस्तुत माहिती येथे दिली आहे.

**ना.सी. फडके –**

गुजगोष्टींविषयी व त्यातील काही विचार यापूर्वी आपण संदर्भ म्हणून पाहिले आहेतच. त्यांनी लिहिलेले जे निबंध आहेत त्यातील पहिला पांढरा केस, बाजार पोरखेळ, शाई, हरवली म्हणून सापडली, हे निबंध मुळातून वाचण्यासारखे आहेत. या निबंधातून प्रा. ना.सी. फडके यांच्या विचारातील सहजता, साध्या विषयातही त्यांनी पाहिलेले जीवनसौंदर्य, भाषेची ऐट, भाषेला त्यांनी दिलेला ढंग, वरवर साधा वाटणारा विषय पण या विषयाचे गांभीर्य पाहून त्यात भरलेला प्रगल्भ विचार, म्हणजेच विचाराची प्रौढी, जे विचार बौद्धिक आहेत ते साधे-सुधे नाहीत तर एका तत्त्वज्ञाने मांडलेले विचार आहेत. याची जाणीव त्यांचे निबंध वाचताना आपोआप होते. सरळ, साधी, लाघवी अशी गोड भाषा, वाचकांना मोहित करणारी सहज गप्पा मारत आहेत, अशा पध्दतीने त्यांनी केलेले निवेदन नजरेत भरते. आपण जणू गप्पांच्या मैफलीत बसून गप्पांच ऐकत आहोत, असे वाटते. एखादा हुशार माणूस आपले अनुभव सांगत आहे ते ऐकत रहावे, असे वाटते. तसे त्यांचा निबंध वाचताना आपल्या आजूबाजूला अनेकजन बसले आहेत ते ही मन लावून ऐकत आहेत, असे वाटते. खरे तर कुणीही आपले विचार केव्हा ऐकतात जेव्हा आपल्याजवळ सांगण्यासारखे काही असते. निबंधकाराला तसे लिहिता आले पाहिजे की ज्यामुळे वाचकाला आपला निबंध वाचण्याचा कंटाळा येणार नाही. तो पुन्हा-पुन्हा वाचेल. ना.सी. फडके यांच्या समकालीन लेखन करणारे मराठी साहित्यातील थोर लेखक ज्ञानपीठ पुरस्काराचे गौरवशाली मानकरी वि.स. खांडेकर यांनी कथा कादंबरी या साहित्यप्रकारात अत्यंत भरीव दर्जेदार व गुणात्मक असे लेखन केले. तसेच त्यांनी मराठी साहित्यात खूप सुंदर, असे निबंधही लिहिले. त्यांच्या निबंधात काव्यात्म भावानुभवातील तरल असे विचार जे वाचकांच्या संवेदनांना कलात्मकतेचा अनुभव देतात. वि.स. खांडेकर हे एक प्रज्ञावंत आणि प्रतिभावंत असे लेखक होते. त्यांच्या कल्पना किती उदात्त होत्या, विचार कसे प्रगल्भ असतात, आपले विचार प्रकट करताना भाषेचा वापर वि.स. खांडेकर कसे करतात ते त्यांचे निबंध वाचले तर आपल्या लक्षात येईल. लघुनिबंधाविषयी लिहिताना वि.स. खांडेकरांनी म्हटले आहे. ‍‍ञ्ज्लघुनिबंध लेखकाच्या मनात प्रवेश करतो. तो त्याला गुदगुल्या करीत गमतीदार विचार, चमत्कृतिपूर्ण कल्पना, जीवनातील विसंगती सौम्यपणे सूचित करणारा प्रसंग, नाजूक, तांबूस पालवीप्रमाणे एखादी साधी व गोड भावना लेखकाच्या व्यक्तिमत्त्वाला स्पर्श करून जाते आणि लघुनिबंधाचे बीज रूजते.फ्फ रा.श्री. जोग गौरवग्रंथ पृष्ठ २४६.

**वि.स. खांडेकर :**



Scanned with OKEN Scanner

.वि.स. खांडेकर यांच्या लघुनिबंधात काव्यात्मकतेचा अनुभव तर येतोच पण त्याबरोबर त्यांच्या विचारातील चिंतनही विचारप्रवर्तक असे असते. विचाराची जशी रेलचेल तसेच अधुन-धुन येणारे विनोदही मोठे मार्मिक असतात. ते परिस्थितीवर भाष्य करतात. यातील त्यांच्या कल्पना अत्यंत मोहक असतात. आपण एखाद्या बागेत उमलेलेले फुल किंवा लहान मूल पाहिल्यानंतर जसे प्रसन्न वाटते अगदी तसेच भावरम्य असे वि.स. खांडेकर यांच्या निबंधाचे वाचन करताना प्रसन्नतेचा अनुभव येतो. त्यांचे निबंध रुमधूर अविट गोडी असलेले ज्याची रुची चाखताना म्हणजे एक वाचक म्हणून त्यांच्या निबंधाचा आस्वाद घेताना या निबंधातून आलेले सुविचार, सुभाषिते, चपखलपणे वापरलेले संवाद, चटकदार वळण घेत घेत केलेली भावपूर्ण तितकीच अर्थपूर्ण अशी वाक्यरचना, किती कौशल्याने आणि मार्मिक पध्दतीने काळजीपूर्वक वि.स. खांडेकर लिहितात याचा अनुभव येतो. त्यांनी लिहिलेले जे लघुनिबंध आहेत त्यातील उंबरातील किडे, चांदण्यात, अविनाश संकेत, नवा खिसा हे लघुनिबंध पाहण्यासारखे आहेत. वि.स. खांडेकरांच्या निबंधातून तात्विक विचार प्रकट केलेले दिसतात. प्रगल्भतेने अविष्कृत झालेले चिंतन पहावयास मिळते. त्यांनी चिकित्सा करून केलेले विवेचन हे किती चिंतनगर्भ आहे याची जाणीव होते. एक लघुनिबंधकार म्हणून मराठी साहित्याला वि.स. खांडेकर यांनी दिलेले योगदान अत्यंत मोलाचे असे आहे.

**प्रा. अनंत काणेकर :**

मराठी साहित्यामध्ये प्रा. अनंत काणेकर यांनीही वैशिष्ट्यपूर्ण असे लक्षवेधी निबंध लिहिले. शिंपले आणि मोती, तुटलेले तारे, उघड्या खिडक्या, पिकली पाने, पांढरी शिडे हे प्रा. अनंत काणेकर यांनी लिहिलेले निबंध पाहण्यासारखे व वाचनीय असे आहेत. त्यांच्या निबंधाची भाषा ही अत्यंत जिव्हाळ्याची आपलेपणा घेवून आलेली अगदी जवळच्या माणसाशी आपण जसे मन मोकळे करून बोलतो तसे काणेकर लिहितात हे त्यांचे निबंध वाचताना जाणवते. त्यांच्या निबंधात आलेला जो संवाद असते त्यातून ते वाचकांशी किती आपलेपणाने हितगूज करतात त्यांचे निवेदन हे जणू वाचकाशी संवाद करणारे आहे असे वाटते. विचारातील अनुकुलता आणि प्रतिकुलता, पारंपरिकता आणि आधुनिकता नवविचार व जूना विचार काळाबरोबर बदललेला माणूस, जुन्या नव्यातील साम्य, जे शाश्वत आहे ते वरवर बदललेले वाटले तरी जे आहे ते कसे असते पण माणूस समजून घेताना जगताना मूळ तत्त्व सोडून कसा आहे तोच तेवढ्यापूरता संकुचित विचार करतो. माणसाच्या ज्या वृत्ती, प्रवृत्ती आहेत. संधीसाधू सुखासीन दृष्टी, त्याग, सेवाभाव, खरे सुख आणि दुःखबद्दलची कल्पना, अज्ञानामुळे घडणाऱ्या चूका पण आपला विचार चुकीचा आहे हे कळल्यानंतर होणारा बदल अत्यंत चपखलपणे वाचकांच्या लक्षात प्रा. अनंत कानेकर आणून देतात. त्यांच्या विचाराला असलेला मोकळेपणा, विनोदाची झुळूक, चुटके या बरोबरच आपले अनुभव सांगताना केलेला उपहास, मध्येच आलेली एखादी दंतकथा म्हणजे ना.सी. फडके यांच्या समकालिन लेखन करणारे मराठी साहित्यातील थोर लेखक ज्ञानपीठ पुरस्काराचे गौरवशाली मानकरी वि.स. खांडेकर यांनी कथा कादंबरी या साहित्यप्रकारात अत्यंत भरीव दर्जेदार व गुणात्मक असे लेखन केले. तसेच त्यांनी मराठी साहित्यात खूप सुंदर, असे निबंधही लिहिले. त्यांच्या निबंधात काव्यात्म भावानुभवातील तरल असे विचार जे वाचकांच्या संवेदनांना कलात्मकतेचा अनुभव देतात. वि.स. खांडेकर हे एक प्रज्ञावंत आणि प्रतिभावंत असे लेखक होते. त्यांच्या कल्पना किती उदात्त होत्या, विचार कसे प्रगल्भ असतात, आपले विचार प्रकट करताना भाषेचा वापर वि.स. खांडेकर कसे करतात ते त्यांचे निबंध वाचले तर आपल्या लक्षात येईल. लघुनिबंधाविषयी लिहिताना वि.स. खांडेकरांनी म्हटले आहे. ङ्कलघुनिबंध लेखकाच्या मनात प्रवेश करतो. तो त्याला गुदगुल्या करीत गमतीदार विचार, चमत्कृतिपूर्ण कल्पना, जीवनातील विसंगती, सौम्यपणे सूचित करणारा प्रसंग, नाजूक, तांबूस पालवीप्रमाणे एखादी साधी व गोड भावना लेखकाच्या व्यक्तिमत्त्वाला स्पर्श करून जाते



LATUR
Scanned with OKEN Scanner

आणि लघुनिबंधाचे बीज रूजते.फक्त.श्री. जोग गौरवग्रंथ पृष्ठ २४६.

वि.स. खांडेकर यांच्या लघुनिबंधात काव्यात्मकतेचा अनुभव तर येतोच पण त्याबरोबर त्यांच्या विचारातील चिंतनही विचारप्रवर्तक असे असते. विचाराची जशी रेलचेल तसेच अधुन-मधुन येणारे विनोदही मोठे मार्मिक असतात. ते परिस्थितीवर भाष्य करतात. यातील त्यांच्या कल्पना अत्यंत मोहक असतात. आपण एखा)ा बागेत उमलेले फुल किंवा लहाण मूल पाहिल्यानंतर जसे प्रसन्न वाटते अगदी तसेच भावरम्य असे विचार वि.स. खांडेकर यांच्या निबंधाचे वाचन करताना प्रसन्नतेचा अनुभव येतो. त्यांचे निबंध सुमधूर अविट गोडी असलेले ज्याची रूची चाखताना म्हणजे एक वाचक म्हणून त्यांच्या निबंधाचा आस्वाद घेताना या निबंधातून आलेले सुविचार, सुभाषिते, चपखलपणे वापरलेले संवाद, चटकदार वळण घेत घेत केलेली भावपूर्ण तितकीच अर्थपूर्ण अशी वाक्यरचना, किती कौशल्याने आणि मार्मिक पध्दतीने काळजीपूर्वक वि.स. खांडेकर लिहितात याचा अनुभव येतो. त्यांनी लिहिलेले जे लघुनिबंध आहेत त्यातील उंबरातील किडे, चांदण्यात, अविनाश संकेत, नवा खिसा हे लघुनिबंध पाहण्यासारखे आहेत. वि.स. खांडेकरांच्या निबंधातून तात्त्विक विचार प्रकट केलेले दिसतात. प्रगल्भतेने अविष्कृत झालेले चिंतन पहावयास मिळते. त्यांनी चिकित्सा करून केलेले विवेचन हे किती चिंतनगर्भ आहे याची जाणीव होते. एक लघुनिबंधकार म्हणून मराठी साहित्याला वि.स. खांडेकर यांनी दिलेले योगदान अत्यंत मोलाचे असे आहेत.

मराठी साहित्यामध्ये प्रा. अनंत काणेकर यांनीही वैशिष्ट्यपूर्ण असे लक्षवेधी निबंध लिहिले. शिंपले आणि मोती, तुटलेले तारे, उघड्या खिडक्या, पिकली पाने, पांढरी शिडे हे प्रा. अनंत काणेकर यांनी लिहिलेले निबंध पाहण्यासारखे व वाचनीय असे आहेत. त्यांच्या निबंधाची भाषा ही अत्यंत जिव्हाळ्याची आपलेपणा घेवून आलेली अगदी जवळच्या माणसांशी आपण जसे मन मोकळे करून बोलतो तसे काणेकर लिहितात हे त्यांचे निबंध वाचताना जाणवते. त्यांच्या निबंधात आलेला जो संवाद असतो त्यातून ते वाचकांशी संवाद करणारे आहे असे वाटते. विचारातील अनुकुलता आणि प्रतिकुलता, पारंपारिकता आणि आधुनिकता नवविचार व जुना विचार काळाबरोबर बदललेला माणूस, जुन्या नव्यातील साम्य, जे शाश्वत आहे ते वरवर बदललेले वाटले तरी जे आहे ते कसे असते पण माणूस समजून घेताना जगताना मूळ तत्त्व सोडून कसा आहे तोच तेवढ्यापूरता संकुचित विचार करतो. माणसाच्या ज्या वृत्ती, प्रवृत्ती आहेत. संधीसाधू सुखासीन दृष्टी, त्याग, सेवाभाव, खरे सुख आणि दुःखाबद्दलची कल्पना, अज्ञानामुळे घडणाऱ्या चूका पण आपला विचार चुकीचा आहे हे कळल्यानंतर होणारा बदल अत्यत चपखलपणे वाचकांच्या लक्षात प्रा. अनंत कानेकर आणून देतात. त्यांच्या विचाराला असलेला मोकळेपणा, विनोदाची झुळूक, चुटके, या बरोबरच आपले अनुभव सांगताना केलेला उपहास, मध्येच आलेली एखादी दंतकथा म्हणजे



LATUR

Scanned with OKEN Scanner

LATUR

# MANJARA CHARITABLE TRUST'S
# SMT. SUSHILADEVI DESHMUKH SENIOR COLLEGE, LATUR
## Project Work / Field Work

## *Certificate*

This is to certify that, खुरसे संदीप दिलीप, कांबळे गणेश दयानंद, कोंगटे वैष्णवी महादेव, राठोड पूजा सुभाष

Mr./Mrs. शिकलकर निषाद मुस्तफा

has successfully completed the Project Work/ Field Work entitled

मराठी साहित्यातील निबंधकार

Conducted by the Department of मराठी in the academic year 2022-23.

Project Guide

Head of the Department

Scanned with OKEN Scanner